SAMPLE CONTENT

मराठी (LL)

# व्याकरण व लेखन



Std. V

(ENG. MED.)

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

अमृत पुलेकर
M.A., B.Ed.

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (LL)

# व्याकरण व लेखन

## इयत्ता पाचवी

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित कृती समाविष्ट
- व्याकरणाच्या उत्तम आकलनाकरिता चित्रांद्वारे संकल्पनांचे स्पष्टीकरण.
- व्याकरण विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- व्याकरण विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरिता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरिता उत्तरसूची समाविष्ट
- लेखन विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- लेखन विभागातील घटकांमध्ये सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 1269**

P.O. No. 4808

# प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील प्रत्येक टप्पा महत्त्वाचा असतो. इयत्ता पाचवीचे वर्षही विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी **टार्गेट प्रकाशनाचे मराठी (LL) व्याकरण व लेखन इयत्ता पाचवी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरणात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सराव कृती समाविष्ट केल्या आहेत. शब्दसंपत्ती व व्याकरणावरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

लेखन विभागात नवनिर्मितीचा आनंद दडलेला असतो. विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. लेखन विभागामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना कृतींनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरणावर आधारित भरपूर कृती, लेखन विभागातील १० निबंध, ६ चित्रवर्णन, ५ पत्रे, ७ कथा, ५ गद्य आकलन, सूचनाफलक, घोषवाक्ये, चित्रसंदेश, अनुलेखन व सुवचने एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी सुलभभारती; सहावे पुनर्मुद्रण: २०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **व्याकरण विभाग** | |
| १. | शब्दांच्या जाती | |
| • | नाम | १ |
| • | सर्वनाम | ३ |
| • | विशेषण | ५ |
| • | क्रियापद | ७ |
| २. | उपसर्ग आणि प्रत्यय | ९ |
| ३. | समानार्थी शब्द | १३ |
| ४. | विरुद्धार्थी शब्द | १५ |
| ५. | लिंग | १८ |
| ६. | वचन | २२ |
| ७. | वाक्प्रचार | २६ |
| ८. | विरामचिन्हे | ३० |
| ९. | लेखननियम | ३४ |
| १०. | शब्दसंपत्ती | ३७ |
| • | सराव कृतिपत्रिका – १ | ५२ |
| • | सराव कृतिपत्रिका – २ | ५३ |
| • | उत्तरे | ५४ |
| | **लेखन विभाग** | |
| १. | निबंधलेखन | ६३ |
| २. | पत्रलेखन | ६९ |
| ३. | कथालेखन | ७२ |
| ४. | गद्य आकलन | ८१ |
| ५. | सूचनाफलक | ८४ |
| ६. | चित्रसंदेश | ८५ |
| ७. | घोषवाक्ये | ८७ |
| ८. | अनुलेखन | ८८ |
| ९. | सुवचने | ८९ |


**[टीप: पाठाखाली दिलेले व्याकरण व लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content


Sample Content


# व्याकरण विभाग


## १ शब्दांच्या जाती

### नाम (Noun)

कोणत्याही व्यक्तीचे, वस्तूचे, ठिकाणाचे, पशू-पक्ष्यांचे किंवा मानवी भावना, गुण यांना दिलेले नाव म्हणजे 'नाम' होय.


हत्ती


नदी


आनंद

### सराव कृती

**कृ.१. पुढील चित्रातील नामे ओळखून लिहा.**




उत्तर: i. ------------------ ii. ------------------ iii. ------------------ iv. ------------------


v. ------------------ vi. ------------------ vii. ------------------ viii. ------------------


ix. ------------------ x. ------------------ xi. ------------------ xii. ------------------


xiii. ------------------ xiv. ------------------ xv. ------------------

**कृ.२. पुढील चित्रांवरून 'नामे' ओळखून लिहा.**


i. 
------------------

ii. 
------------------


iii. 
------------------

iv. 
------------------


Sample Content

v. 


------------------

vi. 

------------------

vii. 


------------------

viii. 

------------------


## कृ.३. पुढील चित्रांसाठी कंसात दिलेली योग्य नामे निवडून लिहा.

(पक्षी, खेळ, कुत्रा, प्राणी, कावळा, इमानदारी, कबड्डी, संघ, मोती, चोच)

i. 

**उत्तर:** ---------------------------

---------------------------

ii. 

**उत्तर:** ---------------------------



---------------------------

iii 

**उत्तर:** ---------------------------

---------------------------

## कृ.४. खालील नामे व दिलेली चित्रे यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| क्र. | नाम | उत्तर | | चित्र |
|---|---|---|---|---|
| i. | आनंद | ------------------------------- | अ. |  |
| ii. | राग | ------------------------------- | ब. |  |
| iii. | दु:ख | ------------------------------- | क. |  |
| iv. | भीती | ------------------------------- | ड. |  |
| v. | निराशा | ------------------------------- | इ. |  |

Sample Content

Page no. **3** to **51** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# सराव कृतिपत्रिका – १
## व्याकरणावर आधारित

**वेळ: १ तास** **एकूण गुण – १५**

**कृ.१. खालील शब्दांचे नाम आणि विशेषण यांत वर्गीकरण करा.** **(२ गुण)**

किशोर, रागीट, बेईमान, नोकर.

| नाम | विशेषण |
|---|---|
| ---------------------- | ---------------------- |
| ---------------------- | ---------------------- |

**कृ.२. खालील शब्दांना योग्य उपसर्ग व प्रत्यय जोडा व तयार होणारे शब्द लिहा.** **(२ गुण)**

i. अप → मान, कार

ii. काम, कष्ट ← करी

**कृ.३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(१ गुण)**

i. प्रकाश – ----------------------  ii. पान – ----------------------

**कृ.४. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१ गुण)**

i. सुंदर × ----------------------  ii. मान × ----------------------

**कृ.५. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(२ गुण)**

i. कावळा – ----------------------  ii. बोका – ----------------------

iii. वाघीण – ----------------------  iv. स्त्री – ----------------------

**कृ.६. खालील वाक्प्रचार व त्यांच्या अर्थाच्या योग्य जोड्या जुळवा.** **(२ गुण)**

| क्र. | वाक्प्रचार | उत्तर | | अर्थ |
|---|---|---|---|---|
| i. | तुडुंब भरणे | ------------------------------ | अ. | अंघोळ घालणे |
| ii. | न्हाऊ घालणे | ------------------------------ | ब. | काठोकाठ भरणे |
| iii. | आव्हान देणे | ------------------------------ | क. | लक्षपूर्वक पाहणे |
| iv. | निरखून पाहणे | ------------------------------ | ड. | लढण्यासाठी बोलावणे |

**कृ.७. खालील शब्दांतील अचूक शब्द ओळखा.** **(१ गुण)**

i. नाऊ, न्हावू, न्हाऊ, न्हाउ – --------------  ii. तुडूंब, तुडुंब, तूडूंब, तुंडूब – --------------

**कृ.८. खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(२ गुण)**

i. पायात चप्पल न घालता – ----------------  ii. दानधर्म करणारा – ----------------

**कृ.९. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.** **(२ गुण)**

i. ऐटदार – ----------------------------------------

ii. गावभर – ----------------------------------------

Sample Content

Page no. 53 is purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# उत्तरे

## १. शब्दांच्या जाती

### • नाम

१. i. झाड ii. डोंगर iii. पक्षी
iv. सूर्य v. मंदिर vi. माणूस
vii. रस्ता viii. घर ix. बैल
x. बैलगाडी xi. गवत xii. दगड
xiii. बकरी xiv. गाव xv. ढग

२. i. मोर ii. वाघ iii. गुलाब
iv. माठ v. विहीर vi. चप्पल
vii. चंद्र viii. नळ

३. i. पक्षी, कावळा, चोच
ii. खेळ, कबड्डी, संघ
iii. कुत्रा, प्राणी, इमानदारी, मोती

४. (i – इ) (ii – क) (iii – ब) (iv – अ) (v – ड)

५. i. काका, संजू ii. आजी, जागा
iii. दिनेश, मुलगा iv. घर, कुलूप
v. दार vi. आमराई
vii. माया, पाकीट

६.

| व्यक्ती | वस्तू/ठिकाण/वाहन | गुण |
|---|---|---|
| अंजू, संजू, आजी, दिनेश, रमा, विनय. | घर, फोन, बस, रेल्वे, हिमालय, मुंबई. | नम्रपणा, मोठेपणा, गारवा, आपुलकी, चतुराई, धैर्य, शूरता, चपळाई, कौशल्य. |

७. i. अमर ii. कंपासपेटी iii. अजय
iv. दार v. पक्षी vi. मेणबत्ती

### • सर्वनाम

१. i. तिला ii. तो, ही iii. ती
iv. मी v. माझा vi. आम्ही

२. i. **मी** शेपूट आणि परांच्या मदतीने पोहतो.
ii. कपडे वाळल्यानंतर भाऊने **त्यांच्या** घड्या करून टेबलावर ठेवले.
iii. **तुझा** प्रामाणिकपणा **मला** आवडला.
iv. सकाळी **तो** लवकर उठला.
v. हा तर **आमचा** बैल!
vi. **हा** बैल **तुझा** नाही.

३. i. तो/हा ii. ती/ही iii. ते/हे
iv. तो/हा v. तो/हा vi. ती/ही
vii. ती/ही viii. तो/हा

### • विशेषण

१.

अ) i. टपटपणारा ii. जोरदार
iii. मुसळधार iv. दमदार
v. बुरबुर vi. रिमझिम
vii. धोऽ धोऽऽ

ब) i. कच्चा ii. पिक्का
iii. गोड iv. आंबट
v. हिरवा vi. पिवळा
vii. चविष्ट

क) i. लाल ii. सुगंधी
iii. एक iv. ताजा
v. कोमेजलेला vi. काटेरी
vii. सुंदर

ड) i. नाजूक ii. छोटे
iii. रंगीबेरंगी iv. सुंदर
v. अनोखे vi. पिवळे
vii. भित्रे

२. i. दोन
ii. ऐटदार, रंगीबेरंगी, लाबंसडक, मोहक
iii. दाट
iv. लख्ख

३. i. हिरवा ii. सुंदर iii. उंच iv. पाच
v. अनेक vi. मोठे vii. काळा

४. i. मंद – वारा ii. पिवळे – ऊन
iii. मधुर – आवाज iv. भयंकर – दुष्काळ
v. रंगित – पतंग

५. i. आम्रतरू नदीवर **शीतल** छाया धरतात.
ii. आमचे गाव **छोटे** आहे.
iii. बाहेर **रिमझिम** पाऊस पडत होता.
iv. समीरने **ओला** कपडा आणला.

६. i. सुंदर – सकाळ ii. औषधी – मध
iii. मंद – वारा iv. दरवळणारा – सुवास
v. झुळझुळ - पाणी vi. मंजूळ – गाणे
vii. शीतल - छाया

Sample Content

- **क्रियापद**

१. i. पक्षी बाहेर आले.
ii. मारियाने आकाशाकडे पाहिले.
iii. दारावरची बेल वाजली.
iv. मारिया पळत दाराकडे गेली.
v. मोराने पिसांचे निरीक्षण केले.
vi. मिनूला खूप आनंद झाला.
vii. दिनूची आई आजारी होती.
viii. मी आहे नदी.
ix. 'थांबला तो संपला' असेच मी सगळ्यांना सांगत असते.
x. सायंकाळी आम्ही घरी परतलो.

२. i. मारिया घरी **आली**.
ii. मारिया कविता **करते**.
iii. मारियाने दार **उघडले**.
iv. मी चेंडू **फेकला**.
v. ताई पुस्तक **वाचते**.
vi. मिनू पुढे **निघाली**.
vii. मिनूने बदकाला हाक **मारली**.
viii. मिनू आनंदाने घरी **गेली**.
ix. ही **घे** तुझी पिसं.
x. दिनूने आईसाठी चहा **केला**.

३.

| | | | |
|---|---|---|---|
| i. | चालणे | चालतात | चालवतात. |
| ii. | पळणे | पळतात | पळवतात. |
| iii. | भेटणे | **भेटतात** | **भेटवतात.** |
| iv. | **करणे** | करतात | **करवतात.** |
| v. | मिळणे | **मिळतात** | **मिळवतात.** |
| vi. | थांबणे | **थांबतात** | **थांबवतात.** |

४. i. **बैल** गवत खातो. – **खातो**
ii. **रिमा** पत्र लिहिते. – **लिहिते**
iii. **रमेश** पुस्तक वाचतो. – **वाचतो**
iv. **गाय** गवत खाते. – **खाते**
v. ते **चित्र** सुंदर आहे. – **आहे**
vi. ते **घर** मोठे आहे. – **आहे**

५. i. सुधीर गोष्ट **सांगतो**.
ii. ते झाड उंच **आहे**.
iii. रोझी गाणे **गाते**.
iv. ती वेल हिरवीगार **आहे**.

६. i. संजू **लवकर** उठतो.
ii. गोगलगाय **हळूहळू** चालते.
iii. हा बंगला नेहमी बंद **असतो**.
iv. **शाळा** वेळेवर भरते.
v. यावर्षी खूप थंडी **पडली**.

## २. उपसर्ग आणि प्रत्यय

- **उपसर्ग**

१. अपकीर्ती, अपशकुन, अपशब्द, अपमान, अपयश.

२. i. गैरसावध, गैरसोय, गैरहिशेबी, गैरहजर, गैरशिस्त, गैरसमज.
ii. नाराज, नाउमेद, नाखुश, नापसंत, नालायक, नाकबूल.

३. i. आमरण ii. कमनशीब iii. अवजड
iv. निरोगी v. प्रतिदिन vi. विज्ञान
vii. सुगंध viii. उपप्रमुख

४. i. दरशेकडा ii. फटफजिती iii. आडगाव
iv. संगीत v. प्रसिद्ध vi. परिश्रम
vii. अवकृपा viii. अनुक्रम

- **प्रत्यय**

१. i. तोंडभर - आजीने आमची **तोंडभर** स्तुती केली.
ii. पिशवीभर - रामने **पिशवीभर** आंबे आणले.
iii. हातभर - रियाने **हातभर** मेहंदी काढली.
iv. घरभर - अजयने **घरभर** पसारा करून ठेवला होता.


२. i. मायाळू ii. कष्टाळू iii. गोडवा
iv. लहानपण v. चपळता vi. चपळाई
vii. मोठेपण

३. i. चांगुलपणा ii. मोठेपणा iii. राकटपणा
iv. वेगळेपणा v. मोकळेपणा vi. सोपेपणा
vii. कठीणपणा

४. i. इस्त्रीवाले ii. रिक्षावाले iii. भाजीवाले
iv. फळवाले v. झाडूवाले

५. i. चमकदार ii. दुकानदार iii. मालदार
iv. चोपदार v. भालदार vi. खासदार
vii. आमदार viii. गमतीदार ix. रुबाबदार
x. वजनदार

६. i.




Sample Content

Page no. **56** to **62** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# लेखन विभाग

## १ निबंधलेखन

**'विषयाला अनुसरून आपले विचार व भावना यांची साचेबद्ध गुंफण करणे' निबंधलेखनात अपेक्षित असते. निबंधलेखन हा सृजनाचा आविष्कार असतो. 'निबंध' म्हणजे विचार, भावना आणि कल्पनांचे सुसंगत लेखन होय.** यात विषय ठरावीक मर्यादेत प्रभावीपणे मांडावा लागतो. चांगल्या निबंधात उत्तम विचार, भावना, अनुभव, घटना, व्यक्तिविशेष, कल्पना इत्यादींचे माहितीपूर्ण विवेचन केले जाते. उत्तम निबंधलेखन करणे ही एक कला आहे. ती सातत्यपूर्ण सरावाने प्राप्त करता येते.

निबंधांचे वर्णनात्मक निबंध, व्यक्तिचित्रणात्मक निबंध, आत्मवृत्तात्मक निबंध, कल्पनाप्रधान निबंध, वैचारिक निबंध इत्यादी प्रकार पडतात. यावर्षी आपण प्रसंगलेखन, वर्णनात्मक निबंध, वैचारिक निबंध आणि चित्रवर्णन यांचा अभ्यास करणार आहोत.

**लक्षात ठेवा**

- निबंध विषयाला धरून साचेबद्ध रीतीने मांडावा.
- आपले विचार, भावना, कल्पना यांचे चित्रण निबंधातून घडावे.
- निबंध सुटसुटीत, चांगल्या हस्ताक्षरात लिहावा.
- निबंधाचा प्रकार लक्षात घेऊन त्यानुसार रचना करावी.
- प्रसंगलेखन अथवा अनुभवलेखन करताना आपण तेथे उपस्थित होतो असे वर्णन करावे.
- वैचारिक निबंध लिहिताना विषयानुरूप आपल्याला जाणवणाऱ्या सकारात्मक, नकारात्मक बाजू मांडून अंतिम निकष मांडावा.
- चित्रवर्णनाकरता दिलेले चित्र व मुद्दे लक्षात घ्यावेत. त्याला केंद्रस्थानी ठेवून वर्णन करावे.
- निबंध लिहिताना शुद्धलेखनाकडे लक्ष द्यावे. खाडाखोड करणे टाळावे.
- निबंध मुद्देसूद, सोपा, छोट्या वाक्यांत लिहिलेला, सुविचार, म्हणी, इत्यादींचा समावेश असलेला व परिच्छेदामध्ये विभागलेला असावा.

**नमुना कृती**

**कृ.१. खालील विषयांवर निबंध लिहा.**

१. **पावसाळा**

उत्तर:

**पावसाळा**

भारतात तीन ऋतू आहेत. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा. हे ऋतू एकामागोमाग येत असतात. ऋतूंचे हे चक्र अविरत सुरू असते. मला या ऋतूंमध्ये पावसाळा खूप आवडतो. पावसाळा सुरू होतो आणि शाळा सुरू होते. शाळेच्या साहित्याबरोबरच छत्री, रेनकोट इत्यादींची खरेदी होते. त्याचा आनंद वेगळाच असतो. पावसाळ्यात पावसात भिजायला खूप मजा येते. छत्री असूनही पावसात भिजताना, एकमेकांवर पाणी उडवायला मला खूप आवडते. पावसात भिजून गारठल्यावर आईने बनवलेली भजी खाण्यातलं सुख निराळंच! कागदी बोटी पाण्यात सोडून कोणाची बोट सर्वांत पुढे जाईल याची स्पर्धा करण्यातली धमाल ही फक्त पावसाळ्यातच अनुभवता येते.

आजूबाजूला पाणीच पाणी आणि हिरवीगार झालेली झाडे, गवतामुळे हिरवीगार झालेली जमीन हे दृश्य वातावरण प्रसन्न करून जाते. पृथ्वीला न्हाऊ घालून ताजीतवानी करणारा पाऊस मला खूप आवडतो. मैदानावर साचलेल्या पाण्यामुळे झालेल्या चिखलात फुटबॉल, क्रिकेट खेळताना मुद्दामहून पडण्याचा आनंद फक्त पावसाळ्यात अनुभवता येतो. सृष्टीला नवे जीवन देणारा पावसाळा मला हवाहवासा वाटतो.

Sample Content

२. **बैलपोळा**

**उत्तर:**

**बैलपोळा**

महाराष्ट्रात श्रावणात सणांची रेलचेल असते. नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, गोकुळाष्टमी असे अनेक सण श्रावण महिन्यात साजरे केले जातात. श्रावण महिन्यातील अमावास्येला बैलपोळा हा सण साजरा केला जातो. शेतकऱ्याला शेतीमध्ये वर्षभर मदत करणाऱ्या बैलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्रभर हा सण साजरा केला जातो.

काही भागांत या सणाला बेंदूर असेही म्हणतात. या दिवशी बैलांना स्वच्छ अंघोळ घातली जाते. त्यांच्या कपाळावर बाशिंगे बांधली जातात. अंगावर सुंदर नक्षी काढली जाते. पाठीवर मखमली झुली घातल्या जातात. शिंगांना बेगड लावली जाते. घरातील स्त्रिया बैलांना ओवाळतात. त्यांच्यासाठी घराघरांतून पुरणपोळीचा नैवेद्य बनवला जातो. तो त्यांना खाऊ घातला जातो. या बैलपोळ्याच्या दिवशी बैलांना कोणतेही काम दिले जात नाही. सुंदर सजवलेल्या बैलांची ढोलताशांच्या गजरात गावभर मिरवणूक काढली जाते. वर्षभर मालकासाठी राबवणाऱ्या बैलांचा बैलपोळा हा आरामाचा दिवस असतो.

३. **माझा आवडता मित्र**

**उत्तर:**

**माझा आवडता मित्र**

आपले खूप सारे मित्र-मैत्रिणी असतात. आपल्या शेजारी राहणारे, आपल्या सोबत खेळणारे किंवा आपले वर्गमित्र. यात कोणीतरी एक व्यक्ती आपल्यासाठी खूपच खास असते. जिची सोबत आपल्याला हवीहवीशी वाटते. माझा एक असा मित्र आहे- जो मला खूप आवडतो. माझ्या या मित्राचे नाव आहे-‘यश’. यश हा माझा अगदी लहानपणापासूनचा मित्र आहे. आम्ही आंगणवाडीपासून एकत्र आहोत. आम्ही एकत्र खेळतो. एकत्र अभ्यास करतो. आम्ही एकाच सोसायटीमध्ये राहतो; त्यामुळे शाळेत जाण्यासाठी आणि घरी येण्यासाठी आम्ही एकत्रच असतो. शाळेत डबादेखील आम्ही सोबतच खातो.

यश खूप समजूतदार आहे. मी काही चुकीचे वागत असेन तर तो मला अतिशय प्रेमाने समजावतो. रागावणे त्याला माहीतच नाही. प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी पूर्ण करण्याचा तो प्रयत्न करतो आणि मलाही तसे करण्यास प्रोत्साहन देतो. एखाद्या दिवशी मी गैरहजर असेन, तर शाळेचा गृहपाठ पूर्ण करण्यासाठी तो मला मदत करतो. तो स्वभावाने मनमिळाऊ आहे. त्यामुळे, साऱ्यांनाच तो आवडतो. माझा हा मित्र आयुष्यभर माझ्या सोबत असावा असे मला वाटते.

४. **माझी आई**

**उत्तर:**

**माझी आई**

असे म्हणतात, की देव सर्वांच्या घरी जाऊ शकत नाही, म्हणून त्याने आई बनवली. हे खरेच आहे. आपल्या संपूर्ण कुटुंबाची काळजी घेणारी व्यक्ती म्हणजे आपली आई. माझी आईदेखील आमची खूप काळजी घेते. स्वत:ची नोकरी सांभाळून आम्हांला कुठेही काही कमी पडू न देण्याची तिची धडपड रोजच सुरू असते.

माझी शाळा, अभ्यास, डबा, कपडे, पुस्तके यांची तयारी, घरातील सर्व सदस्यांचा स्वयंपाक, त्यांच्या गरजा सांभाळून स्वत:ची तयारी करणे. हे सारे रोजच्यारोज सांभाळणे हे केवळ तीच करू शकते. माझ्या आवडीनिवडी पुरवताना ती कधी हयगय करत नाही. कधी मला काही दुखले खुपले, तर तिला चैन पडत नाही. घरामध्ये प्रत्येक गोष्टींत तिचे बारीक लक्ष असते. कोणताही सण असो तो उत्साहातच पार पडतो. सणासुदीला घरी आलेल्या पाहुण्यांचा पाहुणचार हसतमुखाने करणारी माझी आई म्हणजे आमच्या घराची ऊर्जा आहे. बाबांची प्रत्येक गोष्ट कुठे आहे हे ठाऊक असणारी, माझ्या अभ्यासाकडे कटाक्षाने लक्ष देणारी आई हे सारे कसे काय सांभाळते याचे मला आश्चर्य वाटते. खूप प्रेम करणारी; पण चुकीचे वागलो, तर कठोर होणारी माझी आई मला खूप खूप आवडते.

५. **माझा आवडता प्राणी**

**उत्तर:**

**माझा आवडता प्राणी**

आपल्या आजूबाजूला अनेक प्राणी आपण पाहतो. त्यातील काही पाळीव प्राणी असतात, तर काही जंगली. गाय, बैल, घोडा, मांजर, कुत्रा यांसारखे पाळीव प्राणी आपल्याला नेहमी पाहता येतात. या प्राण्यांपैकी कुत्रा हा प्राणी मला खूप आवडतो; कारण त्याला आपण शिकवू तसे तो वागतो.



Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. V
(ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE & TWO)
- Mathematics

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE)
- Environmental Studies (Part TWO)
- Mathematics

## AVAILABLE BOOKS FOR STD. VI
(ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics


### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

## ADDITIONAL TITLES
GRAMMAR & WRITING SKILLS BOOKS (STD. V & VI)
- Marathi
- Hindi




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

## OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery




Explore our range of STATIONERY

**Target Publications® Pvt. Ltd.**

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

Visit Our Website